# पिंपरी चिंचवडमहानगरपालिका,

**ड क्षेत्रिय कार्यालय, रहाटणी – ४११०१७**

मा. ड प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. २

सभावृत्तांत

दिनांक - ७/०६/२०१९ दुपारी१२.००वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ड प्रभाग समितीची माहे जुन२०१९ ची मासिक सभा दिनांक - ०७/०६/२०१९ रोजी दुपारी १२.००वा. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ३) | मा. श्री. कलाटे राहुल तानाजी | सदस्य |
| ४) | मा. श्री. कलाटे मयूर पांडुरंग सदस्य | सदस्य |
| ५) | मा. श्री. कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) | मा. श्री. कस्पटे संदिप अरुण | सदस्य |
| ८) | मा. श्रीमती. कुटे निर्मला संजय | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती.शितल विठठल उर्फ नाना काटे | सदस्या |
| १०) | मा.श्री.विठठल उर्फ नाना काटे | सदस्य |
| ११) | मा. श्री. आंगोळकर सागर सुनिल | सदस्य |
| १२) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

------------

तसेच खालीलप्रमाणे नामनिर्देशित सदस्य बैठकीस उपस्थित होते.

१) मा. श्री. नखाते संदीप भानुदास

२) मा. श्री. जगताप महेश दत्तात्रय

याशिवाय सभेस मा. विजय खोराटे, क्षेत्रिय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभा शाखा, मा.देवण्णा गट्टुवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.बाबासाहेब गलबले, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. विनोद बेंडाळे, सहा. आरोग्याधिकारी, मा. संध्या वाघ, मा. सुनिल पाटील, उपअभियंता, स्थापत्य, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. सुपे प्र. लेखाधिकारी, मा. एस.एस. गायकवाड, मुख्य आरोग्य निरीक्षक, मा. सुनिल भागवानी, उपअभियंता, नगररचना, मा. ए.टी. माळी, कनिष्ठ अभियंता, बीआरटीएस विभाग, मा. हेमंत देसाई, कनिष्ठ अभियंता, नगररचना, मा. सी.ए. मोरे, कनिष्ठ अभियंता, पर्यावरण, मा. कदम वर्षा,कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. भालेराव एस. डी., कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. धुमाळ प्रवीण, मा. एस.यु.

कुतवळ, मा. अमिन दिक्षित, मा. शरद मोरमारे, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा. रोकडे जयवंत बी., मा. सोनवणे अतुल, मा. मोरे शशिकांत, मा. सौदाई आर. एम., मा.कोतवडेकर संदीप, आरोग्य निरीक्षक, मा. पटेल जे.व्ही., उद्यान निरीक्षक, मा. दुदुसकर सुनिल, मा. खैरे जी.एन. उद्यान सहाय्यक, इ. अधिकारी उपस्थित होते.

----------

प्रशासन अधिकारी तथा सचिव : माहे जुन २०१९ च्या दिनांक-०७/०६/२०१९ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता मिळावी.

मा. सभापती : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

नवनिर्वाचित सभापती श्री. शशिकांत गणपत कदम यांची मा.ड प्रभाग समितीवर पुन:श्च सभापती म्हणुन निवड झाल्याचे कारणास्तव त्यांचा ड क्षेत्रिय कार्यालय व प्रभाग समितीच्या सर्व सन्मा. सभासदांच्या वतीने मा. क्षेत्रिय अधिकारी श्री. विजय खोराटे यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा : मागील सभा कार्यपत्रिका क्र. १३ माहे मार्च २०१९ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता मिळावी.

मा. सभापती : माहे मार्च २०१९ कार्यपत्रिका क्र. १३ चा सभावृत्तांत कायम करण्यात मान्यता देणेत येत आहे.

प्रशासन अधिकारी तथा सचिव , सभाशाखा :सन्मा. सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

मा. सभापती : सन्मा. सदस्ययांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे जुन २०१९ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

मा. सदस्य यांनी मागणी केलेनुसार व मा. सभापती यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले .

विषय क्र. १ : प्रभाग क्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे पिंपळे निलख सर्व्हे नं. ६५मधुन जो ६० फुटी डी.पी. रस्ता जातो सदरील जागा ही श्री. दिपक टकले संदर्भिय व्यक्तीची मालकी हक्काची ६०फुटी डी.पी. साठी संपादित केली असुन, या रस्त्याच्या चौकाला दानशुर व समाजसेवक " स्वर्गीय श्रीपती रावजी टकले" यांचे नाव तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणी नुसार घोषित करणे.

विषयक्र. २ : मौजे पुनावळे व परिसरामध्ये मोठया प्रमाणात लोकवस्तीत वाढ होत असुन सद्यस्थितीत अस्तित्वातील रस्ते व भविष्यातील डी.पी. रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने कमी पडू शकतात. त्यामुळे मौजे पुनावळे येथील वाहतुक समस्या दूर करणेकरीता पुनावळे येथील सर्व्हे नं. १२ व १३ मधुन पांढरेवस्ती कडे जाणा-या १८.०० मी. रुंद

डी.पी. व मुंबई बँगलोर महामहार्गाकडून कोयतेवस्ती कडे जाणा-या ३०.०० मी. रुंद डी.पी. रस्त्याला जोडणे करीता पूर्व –पश्चिम दिशेला १२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता कलम २०५ अंतर्गत घोषित करणे बाबत

विषय क्र. ३ : मौजे पुनावळे येथील जांबे हद्दी शेजारील नाल्याजवळ सर्व्हे नं. ४१ व ४२ मधुन जांबे हद्दीलगत असलेल्या नाल्यालगत ९.०० मीटर रुंदीचा डी.पी.रस्ता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव पारीत झाला असुन सदर ठिकाणची गरज पाहता सदर नाल्या शेजारुन जाणारा रस्ता हा ९.०० मीटर रुंदी ऐवजी१२.००मीटर रुंदीचा घोषित करणेबाबत दुरुस्त ठराव करणे

विषय क्र. ४ : महाराष्ट्राचे सुपुत्र तसेच देशातील पहिले वैयक्तिक प्रकारातील ऑलिंपिक पदक विजेते आणि आजतागायत महाराष्ट्राचे एकमेव वैयक्तिक क्रीडा प्रकारातील ऑलिंपिक पदक विजेते पैलवान खाशाबा जाधव महाराष्ट्राच्या खेळातील सुवर्ण अक्षरानी लिहावे असे नाव खेळाडूंचा आदर्श तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे थोर खेळाडू व्यक्तिमत्व असुन वाकड येथील भुमकर चौका शेजारील शैक्षणिक विभाग म्हणुन प्रसिध्दीस येत असलेला परिसर जो एन एच ४ येथून सुरु होतो. इंदिरा स्कुल, अक्षरा स्कुल, प्रेरणा आश्रम, बिझनेस स्कुल, वर्ल्ड स्कुल, तसेच उच्चभ्रु सदनिका असलेला रस्ता या रस्त्याच्या सुरुवातीस पैलवान खाशाबा जाधव यांचे स्मरणार्थ कमानीचे काम करण्यात येऊन याच रस्त्याला पुढे शेवटपर्यंत ऑलिंपिक पदक विजेते पैलवान के.डी. उर्फ खाशाबा जाधव असे नाव देणे

**तदनंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर खालील प्रमाणे मान्यता देणेत आली.**

विषय क्र. १ — ठराव क्र. २
दिनांक : ०७/०६/२०१९ — विभाग : प्रशासन विभाग
सूचक :मा. संदीप अरुण कस्पटे — अनुमोदक :मा. आरती सुरेश चोंधे
संदर्भ: क्षेत्रिय अधिकारी यांचेकडील दि. ५ / ६ /२०१९ रोजीचा प्रस्ताव

मा.ड प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी दुपारी १२.०० वा.(जर शुक्रवारी सार्वजनिक सुट्टी असल्यास दुसरे दिवशी) प्रभाग समितीची सभा आयोजीत करण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------

विषय क्र. २ — ठराव क्र. ३
दिनांक : ०७/०६/२०१९ — विभाग : स्थापत्य विभाग
सूचक :मा. संदीप अरुण कस्पटे — अनुमोदक :मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ: मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.११/०३/२०१९ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड – पिंपळे निलख हद्दीतील औंध रावेत बी.आर.टी.मार्गावर मौजे सर्व्हे नं. २१० रुबी पार्क स्ट्रीट येथे जो सब-वे उभारण्यात आला आहे त्या सब-वेला पार्क स्ट्रीट सब-वे, कस्पटे वस्ती , वाकड हे नाव तेथील

स्थानिक सदनिका धारक तसेच स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार नामकरण करणेस/घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------

विषय क्र. ३ ठराव क्र. ४

दिनांक : ०७/०६/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक :मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ: मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०९/०३/२०१९ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं. २५१ मानकर चौक कस्पटे वस्ती लगत छत्रपती चौकाकडे जाताना डाव्या बाजूस जो पहिला रस्ता लागतो त्यास “हरी ओम निवास रोड कसप्टे वस्ती वाकड” असे नाव नामकरण करणेस/घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------

विषय क्र. ४ ठराव क्र. ५

दिनांक : ०७/०६/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक :मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ: मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०९/०३/२०१९ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे वाकड सर्व्हे नं.२०९ येथे जो जलकुंभ (पाण्याची टाकी) उभारण्यात येणार आहे त्या जलकुंभास “कै. विष्णू विठोबा कस्पटे” जलकुंभ कस्पटे वस्ती वाकड असे नाव तेथील सदनिकाधारक तसेच तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार मागणीनुसार नामकरण करणेस/घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------

तदनंतर सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले व मा.सभापती यांचे मान्यतेने दाखल करुन घेण्यात आलेल्या ऐन वेळचे विषयांवर खालीलप्रमाणे मान्यता देणेत आली.

विषय क्र. ५ ठराव क्र. ६

दिनांक : ०७/०६/२०१९ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक :मा. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. आरती सुरेश चोंधे

संदर्भ: मा. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०५/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव

प्रभागक्र. २६ वाकड पिंपळे निलख मौजे पिंपळे निलख सर्व्हे नं. ६५ मधुन जो ६०फुटी डी.पी. रस्ता जातो सदरील जागा ही श्री. दिपक टकले संदर्भिय व्यक्तीची मालकी हक्काची ६०फुटी डी.पी. साठी संपादित केलीअसुन, या रस्त्याच्या चौकाला दानशुर व समाजसेवक “ स्वर्गीय श्रीपती रावजी टकले” यांचे नाव तेथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार घोषित करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

--------

विषय क्र. ६ | ठराव क्र. ७

दिनांक : ०७/०६/२०१९ | विभाग : नगररचना विभाग

सूचक :मा. रेखा राजेश दर्शले | अनुमोदक :मा. निर्मला संजय कुटे

संदर्भ: मा. रेखा राजेश दर्शले यांचेकडील दि.०७/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव

मौजे पुनावळे व परिसरामध्ये मोठया प्रमाणात लोकवस्तीत वाढ होत असुन सद्यस्थितीत अस्तित्वातील रस्ते व भविष्यातील डी.पी. रस्ते वाहतुकीच्या दृष्टीने कमी पडू शकतात. त्यामुळे मौजे पुनावळे येथील वाहतुक समस्या दूर करणेकरीता पुनावळे येथील सर्व्हे नं. १२ व १३ मधुन पांढरे वस्तीकडे जाणा-या १८.०० मी. रुंद डी.पी. व मुंबई बँगलोर महामहार्गाकडून कोयते वस्तीकडे जाणा-या ३०.०० मी. रुंद डी.पी. रस्त्याला जोडणेकरीता पूर्व –पश्चिम दिशेला१२.०० मी. रुंदीचा डी.पी. रस्ता कलम २०५ अंतर्गत घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------

विषय क्र. ७ | ठराव क्र. ८

दिनांक : ०७/०६/२०१९ | विभाग : स्थापत्य विभाग

सूचक :मा. रेखा राजेश दर्शले | अनुमोदक :मा. निर्मला संजय कुटे

संदर्भ: मा. रेखा राजेश दर्शले यांचेकडील दि.०७/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव

मौजे पुनावळे येथील जांबे हद्दीशेजारील नाल्याजवळ सर्व्हे नं. ४१ व ४२ मधुन जांबे हद्दीलगत असलेल्या नाल्यालगत ९.०० मीटर रुंदीचा डी.पी. रस्ता महाराष्ट्र मनपा अधिनियम कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचे प्रस्तावास माहे जानेवारी २०१९ च्या सभेत मंजुरी देणेत आली आहे. सदर ठरावास दुरुस्ती सुचविण्यात आली असुन मौजे पुनावळे येथील जांबे हद्दीशेजारील नाल्याजवळ सर्व्हे नं. ४१ व ४२ मधुन जांबेहद्दीलगत असलेल्या ठिकाणची गरज पाहता सदर नाल्या शेजारुन जाणारा रस्ता हा ९.०० मीटर रुंदी ऐवजी१२.००मीटर रुंदीचा घोषित करणेबाबतचे दुरुस्त प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

---------

विषय क्र. ८ | ठराव क्र. ९

दिनांक : ०७/०६/२०१९ | विभाग : स्थापत्य विभाग

सूचक :मा. मयुर पांडुरंग कलाटे | अनुमोदक :मा. मा. रेखा राजेश दर्शले

संदर्भ: मा. मयुर पांडुरंग कलाटे यांचेकडील दि.०७/०६/२०१९ रोजीचा प्रस्ताव

महाराष्ट्राचे सुपुत्र तसेच देशातील पहिले वैयक्तिक प्रकारातील ऑलिंपिक पदक विजेते आणि आजतागायत महाराष्ट्राचे एकमेव वैयक्तिक क्रीडा प्रकारातील ऑलिंपिक पदक विजेते पैलवान खाशाबा जाधव महाराष्ट्राच्या खेळातील सुवर्ण अक्षरानी लिहावे असे नाव खेळाडूंचा आदर्श तसेच सामाजिक बांधिलकी जपणारे थोर खेळाडू व्यक्तिमत्व असुन वाकड येथील भुमकर चौकाशेजारील शैक्षणिक विभाग म्हणुन प्रसिध्दीस येत असलेला परिसर जो एन एच ४ येथून सुरु होतो. इंदिरा स्कुल, अक्षरा स्कुल, प्रेरणा आश्रम, बिझनेस स्कुल, वर्ल्डस्कुल, तसेच उच्च भ्रुसदनिका असलेला रस्ता या

रस्त्याच्या सुरुवातीस पैलवान खाशाबा जाधव यांचे स्मरणार्थ कमानीचेकामकरण्यातयेऊनयाचरस्त्याला पुढे शेवटपर्यंत ऑलिंपिक पदक विजेते पैलवान के.डी. उर्फ खाशाबा जाधव असे नाव देणेबाबतचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

---------

मा. सभापती यांचे मान्यतेने मा .ड प्रभाग समिती सदस्य श्रीमती आरती चोंधे यांनी प्रभागातील कामे होत नसलेबाबत, मा.तुषार कामठे यांनी घंटागाडी कामकाजास अनुसरुन नाराजी व्यक्त केली.मा.सदस्य श्री.राहुल कलाटे यांनी नगररचना विभागाचे अधिका-यांच्या अनुपस्थितीस अनुसरुन नाराजी व्यक्त केली. तसेच नाले साफसफाईच्या अनुषंगाने काळा खडक येथील ड्रेनेजचे पाणी नाल्यात सोडल्याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास आणून दिली .

मा. सभापती : माहे जुनचे सभेस ब-याच विभागांचे विभागप्रमुख उपस्थित राहिलेले नाहीत. ही बाब योग्य नाही. याबाबत संबंधितांना जाणीव करुन देणेकामी क्षेत्रिय कार्यालय स्तरावरुन पत्र पाठविण्यात यावे व सर्व उपस्थित अधिकारी यांनी सन्मा.सदस्यांनी ज्या विषयांबाबत त्यांचे मत मांडले आहे त्या विषयांबाबतची माहिती त्यांना तात्काळ देणेची कार्यवाही करावी. तसेच पावसाळा सुरु होण्यापूर्वी नाले साफसफाईची कामे पूर्ण करणेत यावीत, जलनि:सारण विभागाने ड्रेनेज साफसफाई, स्थापत्य विभागाने स्टॉर्म वॉटर ड्रेनच्या कामांबाबतची कार्यवाही पुर्ण करावी अशा सूचना देऊन माहे जुन २०१९ ची सभा संपल्याचे जाहीर करतो.

सही/-
सभापती,
ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
रहाटणी, पुणे - १७

दिनांक - क्र.डक्षेका/कावि/३५/२०१९
दिनांक – ०९/०५/२०१९

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव,
ड प्रभाग समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
रहाटणी, पुणे - १७